**<u>विशेष दिवाणी दावा क्र.८७/२०१० निशाणी क्र.१७७ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ अ यांना काही कागदपत्र दाखल करण्याबाबत आदेशीत करावे या मागणीसाठी दाखल केलेला आहे.

२. आपल्या अर्जातून प्रतिवादी क्र.१ अ यांनी असे कळविले आहे की, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१ अ यांना कुलमुखत्यार पत्र दाखल करणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे व जरूरीचे आहे. तरी सदर कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादी क्र.१ अ यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर खुलासा दाखल करून त्याद्वारे वादीने अर्जास विरोध दर्शविलेला आहे. आपल्या खुलाश्यातून वादीने असे कळविले आहे की, सदर कागदपत्र प्रतिवादी क्र.१ अ हे विलंबाने दाखल करीत आहे. सबब प्रस्तुत कागदपत्र दाखल करून घेणेस सक्त हरकत नोंदविली आहे.

४. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. दाव्याचा अभिलेख पाहिला व दोन्ही पक्षकारांचे वाद कथनांचे वाचन केले. प्रतिवादी क्र.१ अ यांनी कुलमुखत्यार पत्र दाखल करण्यासाठी परवानगीबाबत प्रस्तुतचा अर्ज केला आहे. सदर कागदपत्र न्यायाच्या दृष्टीने गरजेचे व जरूरीचे आहे. सदर अर्जास वादीने विरोध दर्शविला असला तरी वादीस देखील सदर कागदपत्रांबाबत आपले म्हणणे मांडण्याची संधी आहे. त्यामुळे त्यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करता येईल या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. करीता पुढीलप्रमाणे आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ अ यांनी अर्जासोबत दिलेले कुलमुखत्यार पत्र दाखल करून घेण्यात येत आहे.

Sd/-
( श्रीमती एस. एस. पाखले )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

दिनांक ०८/०१/२०२४

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Vallal L. M. |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 06/01/2024 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 06/01/2024 |
| Order uploaded on | : | 08/01/2024 |

Sd/-